महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १७९ वा | दिनांक : १९/०४/२०२५ | वार : शनिवार

## हिंदवी स्वराज्याची भाषा नष्ट करण्याचा भाजपचा कुटील डाव



**मुंबई** : मराठी भाषा ही महाराष्ट्राची अस्मिता व संस्कृती असून आपल्या संस्कृतीवरच घाला घालण्याचा प्रयत्न भारतीय जनता पक्षाचे सरकार करत आहे. विविधतेत एकता ही आपली ओळख असून ती ओळख पुसण्याचा भाजपचा डाव आहे. पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती करण्याचा सरकारचा निर्णय अत्यंत चुकीचा असून सरकारने हा निर्णय त्वरित मागे घ्यावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

टिळक भवन येथे पत्रकारांशी बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, एकीकडे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा द्यायचा व दुसरीकडे बोलीपासून दूर ठेवायचे ही दुटप्पी भूमिका आहे. भाषा ही संवादाचे साधन आहे, संस्कृती आहे. एकाचवेळी तीन भाषांची सक्ती केल्यानंतर विद्यार्थ्यांनी इतर विषयांचा अभ्यास कसा करायचा. या सक्तीमुळे मुले मुलभूत ज्ञानापासून वंचित राहतील. प्रादेशिक भाषांचा सन्मान झाला पाहिजे व इतर भाषांचाही आदर आहे, पण भाजपला प्रादेशीक संस्कृती व भाषा संपवायच्या आहेत, असा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. या निर्णयामुळे इतर भाषा शिक्षकांच्या नोकऱ्यांवर गदा येऊ शकते. हिंदू, हिंदी व हिंदूराष्ट्र लादण्याचा भारतीय जनता पक्षाचा हा अजेंडा असून अशा सक्तीला काँग्रेसचा विरोध असल्याचे सपकाळ म्हणाले.

दक्षिण भारतात हिंदी भाषेला तीव्र विरोध आहे, मग महाराष्ट्रात सक्ती का? भाषा लादण्याचा हा प्रकार देशाचे तुकडे पाडण्यासाठी आहे का? आणि मराठी भाषा बोलणारे हिंदू नाहीत का? असे सवाल करत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्याचा कारभार ज्या भाषेत चालत होता ती भाषाच भारतीय जनता पक्ष नष्ट करायला निघाले आहे, असा हल्लाबोल हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येची घटना जगाने पाहिली आहे. बीडमध्ये आका गँग, खोके गँग अशा गँग कार्यरत असून बीडमधील अत्याचार थांबत नाहीत. अंबाजोगाई येथे सत्र न्यायालयात वकीली करणाऱ्या एका तरुणीला गावातील ध्वनी प्रदुषणाविरोधात कार्यालयीन तक्रार केल्याच्या कारणावरून सरपंच आणि त्याच्या कार्यकर्त्यांनी शेतात नेऊन रिंगण करून बेदम मारहाण केली. काठ्या आणि लोखंडी पाइप वापरून झालेल्या हल्ल्यामुळे महिला बेशुद्ध पडली. तिला केवळ एका रात्रीत रुग्णालयातून घरी पाठवण्यात आले. हा प्रकार अत्यंत क्रूर आणि निंदनीय आहे. एका वकील महिलेला जर संरक्षण नसेल, तर सामान्य महिलांचे काय? असा प्रश्न विचारून सरकारकडे थोडी लाज शरम बाकी असेल तर तात्काळ गुन्हा दाखल करून आरोपींना अटक करावी व कठोर शिक्षा करावी अशी मागणी हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

## गुणरत्न सदावर्तेंची राज ठाकरे विरोधात पोलिसांत तक्रार



**मुंबई** : वकील गुणरत्न सदावर्ते यांनी हिंदीच्या सक्तीला विरोध करणाऱ्या राज ठाकरे यांच्याविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. राज ठाकरे स्वतःच्या गलिच्छ राजकारणासाठी हिंदीला विरोध करून भाषिक वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचे हे कृत्य गुन्हेगारी संहितेत बसणारे आहे. त्यामुळे मी त्यांच्याविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

गुणरत्न सदावर्ते तक्रार दाखल केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना म्हणाले, राज ठाकरे मनसेत कोणत्या पदावर आहेत हे मला माहिती नाही. पण मी त्यांच्याविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. राज ठाकरे यांनी नव्या शैक्षणिक धोरणाला विरोध केला आहे. राज्य सरकारने गत १६ तारखेला राज्यात हे धोरण राबवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे सर्वसामान्य लोकांच्या मुलांना एक अधिकची भाषा शिकण्याची संधी उपलब्ध झाली. पण राज ठाकरे यांनी स्वतःच्या गलिच्छ राजकारणासाठी व स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी भाषिक वाद निर्माण करण्याचा घाट घातला. त्यांनी आपल्या ट्विटद्वारे शाळा व ग्रंथालये टार्गेट करण्याचे संकेत दिले. ही अत्यंत विदारक गोष्ट आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात किंवा स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कोणताही राजकारणी एवढ्या तालिबानी पद्धतीने वागला नाही. राज ठाकरे यांचे हे वर्तन अत्यंत दुःखद आहे. त्यांना कायदा कळतो की नाही हा प्रश्न उपस्थित करणारे आहे. त्यांच्या कार्यकर्त्यांनी हिंदी भाषा सक्तीच्या निर्णयाची होळी केली. ही कृती अत्यंत चुकीची, बेकायदा, घटनाबाह्य तथा कायदा व सुव्यवस्थेचे उल्लंघन करणारी आहे. विशेषतः ही कृती बॉम्बे पोलिस ॲक्ट मॅन्युअल व गुन्हेगारी संहितेत बसणारी आहे, असे सदावर्ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले, सुप्रीम कोर्टाने एका आदेशाद्वारे सार्वजनिक ठिकाणी फ्लेक्स लावण्यास मनाई केली. पण राज ठाकरे यांच्या कार्यकर्त्यांनी असे फ्लेक्स लावून कायद्याचे उल्लंघन केले. भाषेवर आधारित लोकांना वर्गीकृत करणे, भाषेतील लोकांमध्ये वाद निर्माण करणे, एवढेच नाही तर हे एकप्रकारे जातीय तेढ निर्माण करणारेही कृत्य आहे. त्यामुळे राज ठाकरे यांच्यावर एफआयआर दाखल झाला पाहिजे. मनसेच्या कार्यकर्त्यांनी हिंदीला विरोध करण्यापेक्षा आजूबाजूची दारूची दुकाने बंद करण्याचे निवेदन द्यावे. तेव्हा तुमचा पुरुषार्थ कुठे जातो?

राज ठाकरे यांना कायदा समजत असेल तर त्यांना अटक झाली पाहिजे. त्यांच्या कार्यकर्त्यांना अटक झाली पाहिजे. त्यांना प्रतिबंध झाला पाहिजे. यासाठी आम्ही पोलिसांना नव्या शैक्षणिक धोरणाची प्रत दिली आहे. त्यांनी त्याचा अभ्यास करून या प्रकरणी कारवाई करावी.

राज ठाकरे यांना आतापर्यंत आपला कोणताही मुद्दा इच्छित ठिकाणी नेता आला नाही. हे लोक सर्वसामान्य लोकांना आपली मुले मराठी शाळेत शिकवण्यास सांगतात. त्यानुसार त्यांनी आपल्या पक्षाच्या ५ प्रमुख नेत्यांची मुलेही मराठी शाळेत शिकतात हे जाहीरपणे सांगावे. तुम्हाला स्वतःच्या मुले शिकवण्यासाठी पेडर रोडवरील शाळा लागतात. आणि आमच्या मुलांना व्हर्नाक्युलर शाळांमध्ये शिकण्याचा सल्ला देता. तुम्हाला आम्ही एक अधिकची भाषा शिकावी असे वाटत नाही. ही तुमच्या पोटातील जळजळ आहे. त्यांनी हा जीआर जाळण्यासाठी सर्वसामान्य लोकांच्या मुलांना पाठवले. त्यांची स्वतःची मुले काय करत होती? बेडरूममध्ये क्रिकेटची मॅच पाहत होती का? म्हणजे गुन्हे दाखल व्हायचे असतील तर ते सामान्य कार्यकर्त्यांवर व्हावेत असे त्यांचे धोरण आहे. याद्वारे ते स्वतःच्या कार्यकर्त्यांनाही वेठीस धरत आहेत, असे गुणरत्न सदावर्ते म्हणाले..

## पहिलीपासून हिंदी भाषा बंधनकारकच

**पुणे** : नवीन शैक्षणिक धोरणानुसार 16 एप्रिल रोजी महाराष्ट्र शासनाने राज्यात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सर्व राज्य मंडळाच्या शाळेत बंधनकारक केली आहे. हा निर्णय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व बौद्धिक विकासाच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आलेला आहे. यामध्ये इतर कोणताही हेतू नाही. त्यामुळे शासनाचे निर्णयाचे अंमलबजावणीत सर्वांनी सहकार्य करावे, असे मत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावर यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. त्यामुळे कोणी किती विरोध केला तरी हिंदी भाषेचा निर्णय बदलला जाणार नाही असे राहुल रेखावर यांच्या बोलण्यातून दिसून येत आहे.

रेखावर म्हणाले, राज्यातील शाळेतील शैक्षणिक धोरण व अंमलबजावणीबाबत निर्णय राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या माध्यमातून केले जातात. शिक्षकांना प्रशिक्षित देखील करण्यात येते. 1986-87 नंतर आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे देशात जाहीर झाले आहे. एनसीईआरटी मार्फत राज्य शैक्षणिक अभ्यासक्रम आरखडा जाहीर करण्यात आला. राज्याचा पायाभूत स्तर देखील बनवण्यात येत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अनेक विषय आहे, कोणते अभ्यासक्रम सुरु करायचे, अध्यापन, वेळापत्रक यात समावेश आहे.

राहुल रेखावर म्हणाले, पहिली पासून हिंदी विषय सुरु करण्याबाबत आक्षेप दिसून आला आहे. राज ठाकरे यांनी देखील त्यांचे आक्षेप मांडले आहे. मुख्यमंत्री यांनी देखील सरकारची भूमिका मांडलेली आहे. हिंदी विषय हा सध्या पाचवी पासून बंधनकारक आहे. नवीन शैक्षणिक वर्ष आता 5-3-3-4 अशाप्रकारे झाले आहे. 5 म्हणजे पायाभूत स्तर ज्यात वय वर्ष तीन ते आठ वयोगटातील सर्वांचा समावेश आहे. नर्सरी ते दुसरी पर्यंत याचा सहभाग आहे. 3 म्हणते तिसरी ते पाचवी इयत्ता आहे. त्यानंतर 3 म्हणजे सहावी ते आठवी इयत्ता असून 4 म्हणजे नववी ते बारावी असे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्या त्या स्तराचे अभ्यासाचे निकष लागू होणार आहे.

मागील 25 वर्षापासून इंग्रजी भाषा पहिलीपासून शिकवली जात आहे. इतर भाषिक शाळा देखील अनेक वर्षापासून तीन भाषा शिकवत आहे. महाराष्ट्रातील मुलांना हिंदी भाषा नवीन नाही, कारण ती दैनंदिन जीवनात वापरली जात आहे. मराठीचे महत्व कमी होत नसून मुलांना फार अतिरिक्त त्रास होणार नाही. नवीन बालभारतीचे पुस्तके बनवताना मराठी व हिंदीचे अक्षरगट मुलांना शिकवताना वापरतो तो सारखच ठेवला आहे. त्यामुळे एकत्रितरित्या भाषा शिकता येईल. बहुभाषिय शिक्षणाचा एनपीए मध्ये स्वीकार असून मुळ शिक्षण मातृभाषेत दिले पाहिजे असे मान्य करण्यात आले आहे. मराठी भाषे विषयी कोणता दुजाभाव नाही, भविष्यात होणाऱ्या विद्यार्थ्यांचे सर्वांगीण मूल्यमापन पध्दतीत बदल होणार आहे त्यादृष्टीने हे सकारात्मक पाऊल आहे, असे राहुल रेखावर म्हणाले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ एप्रिल २०२५

# सखेद घुसमटीचा कल्लोळ : उलट्या कडीचं घर




मातोश्री सुभ्रदाबाई काळे,राज्यस्तरीय मुद्रा साहित्य, काव्य पुरस्कार : उलट्या कडीचं घर, सुनील उबाळे.यांना आज मा.भास्कर अंबेकर मा.भास्कर दानवे यांच्या उपस्थितीत साहित्यिका रेखा बैजल यांच्या शुभहस्ते प्रदान होतोय त्यानिमित्ताने..'एक ओळ लिहिली गेली पाहिजे माझ्या नंतर ही"आमचे दिवस तरी कुठे सरळ आहे भाऊ, राहू दे राहिनमह्या सुन्या बरोबर उलट्या कडीच्या घरात..! आजीच्या मुखातून सहज निघालेलं हे वाक्य माझ्या काळजात कोरलं गेलं कायमचं.. हा घुसमटीचा कल्लोळ एक संयतमनातून खडकाला ही धडका मारत नितळ पाझर फोडणारी अस्वस्थ व्यथेची कविता...कवी सुनील उबाळे हा कविता होऊन जगणारा रंगाच्या दुनियेचा रंगारी.डोळ्यात असंख्य कवीची पंख उब घेऊन उबाळे,उमाळे घेऊन जगणारा,घराच्या छतावर व मनाच्या छाती,फांदीवर कवीची नावं गोंदलेली. हा गोंदीवंत,'सु'नील वृतीचा नखशिखांत कवी.लिहितो, "आई तुझ्या बोटांचा स्पर्श झाला अन् जमीन मला उभं राहण्यासाठी मदत करू लागली.आजी तू हसलीस की, बुध्दा सारखी दिसू लागली" या आशयघन राजमुद्रीत बुद्ध धम्माचा सम्यक दृष्टीचा शांतीचा संदेश देणारी अर्पण पत्रिका. आईचा स्पर्श, आजीच्या डोळ्यातील नातवांचा स्वानंद. कवी सुनील उबाळे यांची कविता ही सविनय घरंदाज साध्या जगण्याची आजीच्या श्रध्देय भावनेचा अनुबंध दु:ख दारिद्रयांची नाळ कायमचं बांधलेली. घरकडी, भोरकडी, आकळ, आगळ, यात फक्त हाताला काम आणि भूकेला भाकर मिळाली पाहिजे.अंगभर कपडा नाहीचं. अंग झाकले पाहिजे. अशा ह्या जगण्याच्या लढाईत कवी आजी विषयी लिहितो,"असंख्य तज्ञांचे दावे उधळून लावलेस तू, आणि अजरामर केलंस,माझं करंट जगणं, उलट्या किडींच्या घरात!!"ही कविता संयत मनोभूमिका मांडते.आपण जगतो हेचएक हरफन मस्त मौलाची भूमिका आहे. आलेला प्रत्यक्ष अनुभव सुख देऊन जाणारा आहे. मग तो सच्चाईने स्विकारण्याची ताकद ही कविता देऊन जाते. प्रत्येकाच्याआयुष्याचं सोनं होणारं आहे. ही सकारात्मक शब्दगंध घेऊन येताना कवी लिहितो,"आयुष्याचं सोनं होण्याआधी, वितळून जावा माझ्यातला मी, आणि शिल्लक राहावं करूणेनं लदबदलेलं जगणं "मानवी मूल्यांचा विश्वव्यापकविचार ही कविता नितळ निर्लेप साधकांची जागृती देऊन जाते.मानवी मनाच्या गाभाऱ्यातील शब्द अक्षरांची ज्ञान ज्योत प्रज्वलित करणारी ही कविता.'मला समजून घेता आली नाही आग पोटात ठेवण्याची गोष्ट'ही सखेद मनस्वी वेदना मुखर करणारी विवर कविता जगण्याच्या मूलभूत हक्काची होरपळ होतांना हे निमुटपणे जगावं.'मी जमीनशी नातं तोडून, घराच्या छत भिंतीला उलट लोंबकळत रंगाची मैफिल रंगवली.दुखावर हसणारा कवीमनमुक्त होऊन जणू बासरीच्या काळजात फुंकर मारूनदु:खाची सुमधुर स्वर काढतो.मायेचं आगर म्हणजे माहेर.बालपण आजीच्या मायाळू सावलीत गेले. कधीचं कुणाची शाबासकची धाप पडली नाही.नात्याचंही कुणीच ओळखीचं नाही."मी माहेर नसलेला माणूस"कवितेने बाहेरचा स्नेहळू आहेर पांघरणारा एक शब्दपक्षी आपल्या कवितेची अक्षरनक्षी वाटीत निघाला आहे.भाकरीचा भूगोल भूकेच्या भूप्रदेशात पोटाच्या आतडं खळगीत गेला की, भूक क्षमते.भाक्रीचंआक्रीत कवी लिहितो,"माझा विश्वास उडून गेलाय, शुन्यातून जग घडविणाऱ्या माणसावरचा.. लोकं भले ही लपून ठेवू द्या.सोनं टाळे बंद तिजोरीत.म्या खेळत्या वयातभाकरी तुकडे लपून ठेवले होते "ही भूकेची कविता व्याकूळ करून जाते.पडक्या दिवसांची गोष्ट ही अशीच आई शीळे कुटूके तव्यावर भाजून द्यायची ही खंमग मायेची शिदोरी किती गोड होऊन येते."आज सारं जगणचं कविता होऊन गेलंय,आणि तू कौतुक करत फिरतेस सभोवताली माझ्या कवितांचे"अति सूक्ष्म संवेदनशील सृजन समर्पक रचना आविष्कार या कवितेतून व्यक्त होतोयातील प्रतिमा प्रतिकात्मक निखळ वेगळा बाज आहे.म्हणून ही कविता भौतिकवादाच्या परी सीमारेषा ओलांडते.निर्विवाद ही कविता मोठा आशय देऊ न जाते. जगण्याचा शिनवटा, घालताना कवी शब्दांचे श्वास घेत अनावर झोपेला ही अंगाखांद्यावर शब्दांचे दंश करून घेत आपली ठणक कायम कवटाळतो,"ही कवितेची नशा उतरता कामा नये...!"आपला पारंपरिक घर संसार गणगोत सांभाळत "माझी दानतीची झोळी फाटू देऊ नकोस..."कवी हा एक वेडापीर असतो, त्याला मनसोक्त भटकू द्यावं,मगचं मुठभर शब्दाचं दान त्याला देता येतं.पण मन बदलात कामा नये.ही खूणगाठ ही कविता देऊन जाते.सहानुभूतीच्या पाशात ही कवी गुंतू इच्छित नाही. दिवस बदलतील भूक भाकरी तिचं आहे.अनुभूतीची चव सहानूभूतीने क्षमत नाही."एक पाटी पेन्सिल नव्हती, माझं भविष्य लिहिण्यासाठी.एक शाळा होती.माझ्या कुटूंबाकडंपाठ फिरवलेली"... कवीने निश्चितपणे भूमिका घेऊन लिहिले आहे.उपाशीपोटी तत्वज्ञान चांगल्या माणसांच्या गोष्टी नाही सांगता येत.सर्वहरा माणूस केवळ जगण्याच्या लढाईत लढतो.जणू संकटाच्या कढाईत कढिपत्ता होऊन तळतो.मनाच्या शरीरात कवितेचा पारा.म्हणून कवी लिहितो"सालं आयुष्य कसं निसटत चाललं. मुठीतल्या वाळू सारखं" अतिशय सजग जगण्याची घुसमट ही कविता संयत मनोभूमिका मांडते.कवीचा दृष्टीचा कोनदृष्टांतीक आहे.कबरं खोदायला घेतली.कबरीत झोपून पाहिले.खिशात मुठभर माती घेतली.हा जातीवंत अनुभव मनाला सजग करतो.या हाताने मुठमाती देणारा माणूस शेवटी काय घेऊन जातो.?"पुरल्या नंतर ही उगवेल मी,मी कविता पाहिलेला जादूई माणूस आहे".हे अनादी अनंत सत्य मांडणारी ही कविता.या भंयकर जत्राळलेल्या शहरात.सारी चकवा देणारी माणसं,खरंच हे आक्रीत घडत आहे.कवी म्हणतो मी वेडा असतो तर दगड हानले असते चौफेर,"शहाणा असतो तर मी शब्द वेचले असते सोन्या सारखे जमीनीतून,मी कोण आहे याचा गुंता वाढत चाललाय आता"ही मानवी मनाची मानसिकता उजागर करणारी कविता.सापाच्या वस्तीत माणसाचीआदळ,वर्दळ वाढली तेव्हा पासूनच माणूस विषारी झाली.हे निर्विवाद सत्य मनाला व्यथीत करते.पोरीनं शाळेत कविता म्हटली तर प्रचंड टाळ्या पडल्या .. अनेक पिढ्यांपासून विषय चुकलाय,फळा,खडू पुस्तकाशी भांडण चालू आहे! पोरगी रिकाम्या हाताने उद्याचा सूर्य घेऊन आली अंधारलेल्या घरात!! ही सविनय वास्तवता या कवितेने दिली आहे.कवी आपल्या मुलींच वह्या, पुस्तके,शाळेची फिस भरू शकत नाही वेळेवर यांचा बाप म्हणून खंत वाटते.बापाची पुस्तक,कवितांवर नितांत प्रेम करणाऱ्या मुली.या कवितेनंदिल्या आहेत.अजिंठा कोरीव लेण्याचं कोरलेले शिल्प.मी अथांग बुध्दाचं बोट कधीचं सोडू शकत नाही.तशी मायाळू पत्नी.एक तत्त्वचिंतक नितळ सृजनशील भावनेचा खळाळ ह्या कवितेनं दिला आहे.जो संयत कविता म्हणून येतो.मुक्त व्यक्त सु-नील निळ्या नभाची सत्यनिवेशी माणूसपणाचा दाखला देणारी निर्भय निरभ्र कविता.मनाच्या कोऱ्या कागदावर उमटतांना कवितेचा आत्मा अमर करणारा कवी.कवितेवर निस्सीम प्रेम करणारा कवी.तळहाताच्या फोडावर,श्रमिकांच्या कष्टवंत इमानावर प्रेम करणारा त्याला माणूस म्हणून सन्मानानंजगणं शिकवणारी कविता.ही मुक्तछंदाची स्वतंत्र लयबद्ध अभिव्यक्तीची कमी शब्दात बुध्दाचं अथांग तत्व सांगणारीमनाचा तळ ढवळून काढणारी ही कविता.कविता ही कवीची राजमुद्रा व्हावी. जसे, भाकरीचा चंद्र शोधण्यात,काळ्या मातीत, आई एक नावं असतं.. तसं 'उलट्या कडीचं घर'आजीच्या श्रध्देय भावनेचा अनुबंध मांडणारी.हे ज्ञानचं सुविचारी निर्भिडतत्व कवी सांगून जातो.मुखपृष्ठ हे सरदार जाधव यांचे अतिशय चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक झाले आहे.घराचा दरवाजा,म्हणजे दर्शनी भाग.हा मानवी मुखवटा,म्हणजे तोंडवळा.नाक,नाकाला उलटी कडी.तसे मानवी मनाचे आहे.पोट,भूक,भाकरी,चाकरी विच्यारीत नाही.घर श्रीमंताचे की,गरीबांचे. कडीबंद ती उलटी की सुलटी.सन्मित्र कवी सुनील दा उबाळे यांनाअनेकविध्द पुरस्कार मिळाले.बंडू काळे जालना यांच्या मातोश्री सुभ्रदाबाई काळे राज्यस्तरीय मुद्रा पुरस्कार स्मृतीप्रीत्यर्थ हा काव्यपरिचय कवीवर्यांचे मनस्वी अभिनंदन.



Δपुस्तक परिचय:- **डॉ प्रभाकर शेळके**, जालना
Δप्रकाशक:- अतकरे काका
Δकैलास पब्लिकेशन, संभाजीनगर
Δकाव्यसंग्रह:-उलट्या कडीच घर
Δकवी:-कवी सुनील उबाळे
Δमुखपृष्ठ:-सरदार जाधव
Δकिंमत:-200रूपये.

## 'फुले-आंबेडकरी वाङमयकोश' या महाग्रंथावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद, छ. संभाजी नगर यांच्या वतीने चर्चासत्राचे आयोजन

**छत्रपती संभाजीनर** : दलित साहित्य चळवळीचा प्रारंभ औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयातून झाला. दलित साहित्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'फुले-आंबेडकरी वाङ्:मयकोश' या महाग्रंथावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद, छ. संभाजी नगर यांच्या वतीने शनिवार दिनांक 19 एप्रिल 2025 रोजी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध समीक्षक आणि विचारवंत डॉ. ऋषीकेश कांबळे राहतील.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या ना. गो. नांदापूरकर सभागृहामध्ये सायंकाळी 5 .30 वाजता संपन्न होणार आहे. या क्रार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून डॉ. मुस्तजीब खान, (भारतीय आणि पाश्चात्य साहित्याचे अभ्यासक व इंग्रजी विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ), डॉ. सुधाकर शेंडगे (अनुवादक आणि हिंदी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संशोधक डॉ. सुनिता सावरकर (इतिहास विभाग) हे पुस्तकावर भाष्य करतील. 'फुले आंबेडकरी वाङ्मयकोश' या महाग्रंथावर भाष्य करतील. या कार्यक्रमाला फुले-आंबेडकरी वाङ्मयकोशाचे मुख्य संपादक डॉ. महेंद्र मारोतराव भवरे, संपादक मंडळ सदस्य आणि महारेराचे माध्यम सल्लागर राम दोतोंडे, वाङ्मयकोशाचे समन्वयक डॉ. अशोक इंगळे यांची उपस्थिती राहणार आहे. वाङ्मयाचा इतिहास हा त्या त्या देशातील सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय कार्यकृतीला शब्दांकित करीत असतो. एखाद्या साहित्य प्रवाहाने ऐतिहासिक कामगिरी केली असल्यास त्या प्रवाहातील वाङ्मय आणि त्याची ऐतिहासिकता याचे सांकलन आणि संशोधन होणे फार महत्वाचे असते. वाङ्मय कोशाचे मुख्य संपादक डॉ. महेंद्र भवरे आणि डॉ. अशोक इंगळे, राम दोतोंडे, डॉ. सुनील अवचार, डॉ. मच्छिंद्र चोरमारे, डॉ. अशोक नारनवरे, डॉ. प्रकाश मोगले, डॉ. भास्कर पाटील, पंडित कांबळे, प्रा. ज्ञानेश्वर कांबळे या संपादक मंडळाने अतिशय परिश्रमपूर्वक 'फुले - आंबेडकरी वाङ्मयकोश निर्माण केला आहे. आंबेडकरपूर्व, आंबेडकरकालीन आणि आंबेडकरोत्तर अशा तिन्ही कालखंडातील लेखकांचे योगदान याविषयी महत्वाचा ज्ञानस्त्रोत असणाऱ्या या कोशावरील चर्चेचा कार्यक्रम महाराष्ट्रातील ख्यातकीर्त साहित्यिकांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. 1960 च्या दरम्यान उदयाला आलेल्या दलित साहित्याने सहा-साडेसहा दशकांचा कालखंड पूर्ण केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ, त्यांनी सुरू केलेली वृत्तपत्रे, त्या वृत्तपत्रातून प्रकाशित झालेले साहित्य, आंबेडकरी जलसे, आंबेडकरी लोकगीते आणि दलित साहित्य व या साहित्याचा झालेला विकास ही या देशातील ऐतिहासिक घटना आहे. हा इतिहास समाजाला, विद्यार्थी, संशोधक आणि अभ्यासकांना अवगत व्हावा यासाठी फुले आंबेडकरी वाङ्मयकोश निर्माण करण्यात आला आहे. पुण्याच्या डायमंड प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या तब्बल 1428 पृष्ठांच्या या कोशात सुमारे 562 लेखक, त्यांचे साहित्यातील योगदान व साहित्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. या कार्यक्रमास डॉ. महेंद्र भवरे, फुले-शाहू-आंबेडकर वाङ्मय कोष, संपादक मंडळ सदस्य प्रा. ज्ञानेश्वर कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. मोहन सौंदर्य, उपस्थित राहणार आहेत. वाङ्मयप्रेमी, रसिक व लेखकांनी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ एप्रिल २०२५

# राजर्षी शाहू महाविद्यालय पदवी वितरण समारंभ संपन्न



**वाळुज :** राजर्षी शाहू कला व विज्ञान महाविद्यालय वाळूज येथे दि 12 एप्रिल 2025 रोजी पदवी वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मधुकर चाटसे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.खंदारे सर व डॉ. संजय बिरगणे सर हे उपस्थित होते.या प्रसंगी प्राचार्य डॉ.खंदारे सर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच डॉ.संजय बिरगणे सर यांनी आपले विचार व्यक्त करतांना विद्यार्थ्यांना तुम्ही आता पदवीधर तर झालात परंतु आता स्पर्धेच्या युगात जास्तीत जास्त अभ्यास करणे गरजेचे आहे. असे त्यांनी विचार व्यक्त केले.तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.मधुकर चाटसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना पदवी तर मिळाली आहे.आता तुम्ही सामाजिक जाणीवेतून कार्य करणे गरजेचे आहे.असे त्यांनी सांगितले व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.संजय कांबळे यांनी केले तर सूत्रसंचलन डॉ.मधुकर वाकळे यांनी केले व आभार डॉ.वाय.ई.भालेराव यांनी मानले. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. याप्रसंगी सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी ,विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

# शासनाने लाडक्या दाजींचीही कर्जमाफी करावी, जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांची मागणी

**जालना (प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे) :** लाडक्या बहिणी प्रमाणे ही लाडक्या दाजींचा विचार करून कर्ज माफी करा, अशी मागणी जालना जिल्ह्यातील शेतकरी वर्गातून होत आहे.जालना जिल्ह्यातील शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर नापिकीमुळे कर्जबाजारी आहे, या वर्षात सरासरी उत्पन्नाचे प्रमाण कमी झाले असून शेतकऱ्यांवर राष्ट्रीयकृत बँका तसेच खाजगी बँका ,पतसंस्था ,सावकारी कर्जाचा बोजा आहे. ग्रामीण भागात पाणीटंचाईचे संकटही मोठ्या प्रमाणावर आहे उन्हाची तीव्रता वाढत असून शेतकरी वर्ग नैराश्य अवस्थेत आहे विधानसभा निवडणुकीच्या वेळी आजच्या सत्तेत आलेल्या सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी केली जाईल.असे घोषित केले होते ,परंतु प्रत्यक्षात कर्जमाफी झाली नाही, शासनाने शेतकऱ्यांची शुद्ध फसवणूक केल्याचे शेतकरी नेते सुधीरभाऊ शिंदे सांगतात. गटा~तटाच्या राजकारणामुळे बरेच शेतकरी बांधव जाहीररित्या आपल्या प्रतिक्रिया सरकारच्या विरोधात देत नाहीत परंतु वास्तव मात्र लपत नाही ,शेतकऱ्याच्या नशिबी नेहमीच वनवास असून जगावे कसे हा त्यांच्या समोरचा मोठा प्रश्न आहे. महाराष्ट्र जनशक्तीचे जिल्हा प्रतिनिधी यांच्याशी बोलताना शेतकऱ्यांनी आपले दुःख व्यक्त केले. "बाप भीक मागू देत नाही आणि आई जेऊ घालत नाही,"अशा तीव्र शब्दात अनेक शेतकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रिया आमच्या प्रतिनिधींशी बोलताना व्यक्त केल्यात. मायबाप सरकारने याचा गंभीर विचार करून लाडक्या दाजींना सोयी ~सवलती द्याव्यात किंवा कर्जमाफी करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# पुण्यात युवक काँग्रेसचे रेल्वे रोको आंदोलन




**पुणे :** नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात सोनिया गांधी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना देण्यात आलेल्या नोटिशीच्या निषेधार्थ युवक काँग्रेसने खडकी रेल्वे स्टेशनवर लोणावळा-पुणे लोकल ट्रेन अडवली.नॅशनल हेरॉल्ड प्रकरणाचा गैरवापर करून भारतीय जनता पक्षाने काँग्रेसच्या सर्वोच्च नेतृत्वाला लक्ष्य करण्याचा प्रकार पुन्हा एकदा समोर आला आहे. सोनिया गांधी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना नोटीस पाठवून केंद्र सरकारने राजकीय सूडबुद्धीचा कळस गाठला आहे. या निषेधार्थ महाराष्ट्र युवक काँग्रेसच्या वतीने शिवाजीनगर रेल्वे स्थानकावर पुणे-लोणावळा लोकल ट्रेन रोखून शुक्रवारी तीव्र आंदोलन करण्यात आले.

यावेळी राज्य कार्याध्यक्ष शिवराज मोरे म्हणाले, भाजपकडून सुरु असलेली ही राजकीय सुडाची साखळी आम्ही खपवून घेणार नाही. राहुल गांधींवर खोट्या केसेस लावून त्यांना गप्प करण्याचा प्रयत्न हा लोकशाहीवर हल्ला आहे. देशात भाजपचा हुकूमशाही कारभार आम्ही चालू देणार नाही. रस्त्यावर उतरून, रेल्वे अडवून, सरकारला हादरवण्याचे काम युवक काँग्रेस करणार.

मीडिया विभागाचे अध्यक्ष अक्षय जैन यांनी सांगितले, नॅशनल हेरॉल्ड प्रकरण फक्त एक निमित्त आहे – सत्य बोलणाऱ्या राहुल गांधींना धाक दाखवण्याचा हा डाव आहे. पण आम्हीही इडी, सीबीआय, नोटीसांची भाषा समजून घेतली आहे. जर आमच्या नेत्यांना छळाल, तर प्रत्येक युवक काँग्रेस कार्यकर्ता रस्त्यावर उतरून सरकारला प्रश्न विचारेल.

पुणे शहराध्यक्ष सौरभ अमराळे यांनी सांगितले की, पुणे शहरातून आम्ही हे स्पष्ट करतो की, सोनिया गांधी आणि राहुल गांधी हे आमचे अभिमानाचे नेते आहेत. त्यांच्यावर अन्याय झाला तर पुणे युवक काँग्रेस शांत बसणार नाही. आज ट्रेन थांबवली आहे, उद्या राज्य थांबवू. या आंदोलनामुळे काही काळासाठी लोकल सेवा विस्कळीत झाली होती.

प्रदेश युवक कार्याध्यक्ष शिवराज मोरे, मीडिया विभाग अध्यक्ष अक्षय जैन, शहर अध्यक्ष सौरभ अमराळे,तारीख बागवान, प्रथमेश आबनावे, प्रवीण बिरादार, महेश म्हेत्रे, कौस्तुभ नवले, चैतन्य जायभाये,मतीन शेख, विक्रांत धोत्रे, राहुल शिंदे,अक्षय बहिरट, मुरली बुद्रराम, हर्षद हांडे, आदी उपस्थित होते.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ एप्रिल २०२५


## सरपंचावर मकोका लावावा : शिरसाटांची मागणी





**बीड :** बीडमध्ये अंबाजोगाई तालुक्यातील सनगावचे सरपंच व ग्रामस्थांकडून महिला वकिलाला बेदम मारहाण करण्यात आली आहे. या घटनेनंतर महाराष्ट्रात संताप व्यक्त केला जात आहे. शिंदे सेनेचे नेते संजय शिरसाट यांनी सरपंचावर मकोका लावण्याची मागणी केली आहे. मात्र ग्रामस्थांकडून आरोप फेटाळण्यात आले आहेत. महिलेच्या कुटुंबियांनीच तिला मारहाण केल्याचा दावा ग्रामस्थांकडून केला जात आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, सरपंचाने असलेली मस्ती दाखवण्याचा प्रयत्न केला. महिलेला ज्याप्रकारे मारहाण केली, मला वाटते आता त्याच्यावर मकोका लावावा अशी आमची मागणी राहील. अशा लोकांना धडा शिकवणे गरजेचे आहे, नसता यांची गुंडगिरी भविष्यात आणखी वाढेल.

शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी देखील या घटनेवर संताप व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना सवाल केला आहे. मुख्यमंत्री महोदय हे फोटो पहा आणि तुम्हाला झोप कशी लागते ते सांगा? डीजेच्या आवाजाचा त्रास होत असल्याने त्याची तक्रार केल्याने एका महिला वकिलाला गावच्या सरपंचाने कार्यकर्त्यांसोबत मिळून बेदम मारहाण केल्याची घटना बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील एका गावात घडली आहे. लाठ्या काठ्या आणि पाईपच्या मदतीने केलेल्या या महाराहाणीत महिला वकील जबर जखमी झाल्या आहेत. वकील असलेल्या महिलेला जर मारहाण होत असेल तर या राज्यात कायद्याचा धाक किती आहे हे दिसून येते. या घटनेमुळे महाराष्ट्र आता बिहारच्याही पुढे गेलाय असे दुर्दैवाने म्हणावे लागत आहे, असे रोहिणी खडसे यांनी म्हटले आहे.

हा प्रकार अत्यंत निंदनीय आहे आणि महिलांच्या सुरक्षिततेबाबत सरकारच्या अपयशाची साक्ष देतो. एक वकील असलेल्या महिलेला जर संरक्षण नसेल, तर सामान्य महिलांचे काय? असा सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. महाराष्ट्राला पूर्णवेळ गृहमंत्री असेल तर प्रशासनाने तात्काळ दोषींवर गुन्हा दाखल करून आरोपींना अटक करावी तसेच त्यांना कठोर शासन करावे, अशी मागणी करत सपकाळ यांनी सरकारला थेट आव्हानच दिले.

## पुण्यात काँग्रेस भवनवर भाजप युवा मोर्चाचा मोर्चा




**पुणे :** नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी काँग्रेस पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना नोटीस पाठवली आहे. या विरोधात काँग्रेसच्या वतीने ठिकठिकाणी आंदोलन सुरू असतानाच आता भाजप देखील आक्रमक झाला आहे. पुण्यात भारतीय जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्या नेतृत्वात काँग्रेस भवनावर जाऊन आंदोलन करण्याचा इशारा दिला. त्यामुळे काँग्रेसच्या शहराध्यक्षांसह कार्यकर्त्यांनी सुरक्षेच्या दृष्टीने काठ्या दगड हातात घेऊन काँग्रेस भवन समोर उभे राहिले. दरम्यान पोलिसांनी मोठा बंदोबस्त काँग्रेस भवन आणि बालगंधर्व चौकात तैनात केला. भाजप युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी बालगंधर्व चौकात रास्ता रोको करत काँग्रेस भवनच्या दिशेने कुच केली, मात्र पोलिसांनी कार्यकर्त्यांची धरपकड करत त्यांना पोलिस ठाण्यात नेल्याने पुढील अनर्थ टळला.

याबाबत काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे म्हणाले, पुणे शहरातील राजकीय संस्कृती मध्ये अशाप्रकारे कधी घटना घडली नाही. अनेक ऐतिहासिक चौक येथे राजकीय पक्षांना आंदोलन करता येते. भाजप युवा मोर्चा तिसऱ्यांदा आज काँग्रेस पक्ष कार्यालय याच्यावर चालून येत आहे. मागील वेळी काँग्रेस भवन मध्ये आम्ही उपस्थित नसताना त्यांनी काँग्रेस भवन मध्ये शिरून मोडतोड केल्याचा प्रकार घडला होता .याबाबत आम्ही पोलिसांना रीतसर लेखी तक्रार दिली होती. तसेच सीसीटीव्ही फुटेज देखील दिले होते .मात्र ,पोलिसांनी कोणतीच कारवाई केली नाही अथवा भाजपच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा देखील दाखल केला नाही. यावेळी आम्ही जशास तसे उत्तर देण्यासाठी सज्ज आहे.पोलिस हतबल असून आमच्या ऐतिहासिक काँग्रेस भवनचे संरक्षण करण्यासाठी आम्ही समर्थ आहोत .काँग्रेसचे कार्यकर्ते भाजप युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांना काँग्रेस भवन मध्ये शिरल्यास योग्य अशाप्रकारे स्वागत करतील.

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात काँग्रेस नेत्यांनी घोटाळा केलेला असून त्याबाबत त्यांना तपास यंत्रणांनी नोटीस दिलेली आहे .मात्र ,आपले गैरप्रकार रोखण्यासाठी काँग्रेस आंदोलन करत असून त्यांना आम्ही प्रत्युत्तर देणार आहे. काँग्रेसचा भ्रष्टाचार जनतेसमोर आला पाहिजे अशी आमची भूमिका आहे असे मत यावेळी भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांनी व्यक्त केले.

## रिकाम्या हंड्यांचे तोरण बांधत 'लबाडांनो पाणी द्या' आंदोलनाला सुरुवात




**छ. संभाजीनगर :** संभाजीनगरातील मुकुंदवाडी चौक कमान येथे रिकाम्या हंड्यांचे तोरण बांधत "लबाडांनो पाणी द्या" या जन आंदोलनाची आज ठाकरे गटाच्या वतीने सुरुवात करण्यात आली. संभाजीनगर महानगरपालिकेची २४० एमएलडी पाण्याची आवश्यकता असून दररोज १४० एमएलडी पाण्याचा पुरवठा केला जातो. अशी स्थिती असताना शहराला दोन अथवा तीन दिवसाला पाणी मिळायला पाहिजे, मात्र११ ते १२ दिवसाला शहराला पाणी मिळत असून ही पुरवठा व्यवस्था सुरळीत होण्याची मागणी या वेळी करण्यात आली.

जनसामान्याच्या हक्कासाठी आमचा पक्ष रस्त्यावर उतरला असून संभाजीनगर शहराला पाणी मिळवून देण्यासाठी एल्गार पुकारला असल्याचे या वेळी विरोधी पक्ष नेता अंबादास दानवे यांनी म्हटले आहे. पुढील एक महिन्यात दररोज वेगवेगळ्या प्रकारच्या आंदोलन करून जनसामान्यांचा हा प्रश्न शासन आणि प्रशासन स्तरावर पोहोचवणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

गेल्या पाच वर्षांपासून सुरू असलेले पाणी योजनेचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. ऐन उन्हाळ्यात १० दिवसांनंतर येत आहे. सर्वसामान्यांना पाणी मिळवण्यासाठी प्रचंड कसरत करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव सेनेने सलग महिनाभर 'लबाडांनो पाणी द्या' या आंदोलनाची घोषणा केली. त्यानुसार आज मुकुंदवाडी भागात हे आंदोलन करण्यात आले.

आमच्या काळात किमान दुसऱ्या दिवशी पाणी यायचे, आता दहाव्या दिवशी देखील पाणी येत नसल्याचा आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. या आंदोलनादरम्यान रिकाम्या हंड्यांचे तोरण, नागरिक बैठक, सह्यांची मोहीम, ढोल बजाव आंदोलन, सायकल रॅली, महाविद्यालयीन युवकांशी संवाद, दवंडी देणे, छायाचित्र प्रदर्शन, वार्ड पदयात्रा, कट्टा मीटिंग व जॅकवेलची पाहणी आदींचा आंदोलनात समावेश करण्यात येणार आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com